**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री फ्रान्स आणि स्लोव्हाकिया दौऱ्यावर रवाना/ भारत इनोव्हेट्स सोहळ्याचं उद्या करणार उद्घाटन

- डीआरडीओच्या बहुस्तरीय मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्र चाचण्या यशस्वी

- इराणने शांततापूर्ण नागरी वापरासाठी अणुऊर्जेचा कार्यक्रम राबवायला अमेरिकेची हरकत नाही

- काँगोमधे इबोलाची लागण झालेल्या सतरा नवीन रुग्णांची नोंद, तर आणखी पाच जणांचा मृत्यू

**आणि**

- भारत- अफगाणिस्तान एकदिवसीय क्रिकेट सामना आज धरमशाला इथं रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फ्रान्स आणि स्लोव्हाकिया दौऱ्यावर आज रवाना झाले. देशाच्या धोरणात्मक संकल्पनेत फ्रान्सला विशेष स्थान आहे. आपल्या फ्रान्स भेटीत दोन्ही देशांमधले आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्यावर भर असेल, असं त्यांनी या दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. फ्रान्स भेटीत प्रधानमंत्री उद्या फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह दोन्ही देशांमधल्या नवोन्मेष वर्षानिमित्त आयोजित भारत इनोव्हेट्स या सोहळ्याचं उद्घाटन करतील. देशातल्या उत्कृष्ट स्टार्टअप्सना या कार्यक्रमातून जागतिक गुंतवणूकदारांशी जोडता येईल, तसंच हा सोहळा देशातल्या उच्च शिक्षण परिसंस्थेतल्या नवोन्मेषाला गती देण्यासाठी उपयुक्त ठरेल असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

नंतर प्रधानमंत्री उद्या दोन दिवसांच्या स्लोव्हाकिया दौऱ्यासाठी रवाना होतील. तिथे ते स्लोव्हाकियाचे अध्यक्ष पेलेग्रिनी आणि प्रधानमंत्री फिको यांची भेट घेतील. या दौऱ्यामुळे युरोपीय महासंघासोबतच्या भारताच्या धोरणात्मक भागीदारीला नवी ऊर्जा मिळेल, तसंच

दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय संबंधांनाही नवी गती मिळेल असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

स्लोव्हाकियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री पुन्हा फ्रान्समधल्या एव्हियन इथं परत येतील. तिथे ते १६ आणि १७ जूनला जी सेव्हन देशांच्या शिखर परिषदेत सहभागी होतील. या परिषदेतल्या भारताच्या सहभागातून जागतिक पातळीवर देशाच्या वाढत्या महत्वावर, भागीदार देशांनी दाखवलेल्या विश्वासाची प्रचिती येते असंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. या परिषदेसाठी सलग आठ वेळा भारताला आमंत्रित केलं गेलं आहे.

यानंतर १८ जून रोजी पॅरिस भेटीनं प्रधानमंत्री आपल्या दौऱ्याचा समारोप करतील. तिथं ते फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत विव्हाटेक ट्वेंटी ट्वेंटी सिक्स या आयोजनात सहभागी होतील. पॅरिसमधल्या भारतीय समुदायाला भेटण्यासाठी आपण उत्सुक असल्याचंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

या संपूर्ण दौऱ्यामुळे युरोप आणि जी सेव्हन देशांसोबतच्या भारताच्या दृढ संबंधांना अधिक बळकटी मिळेल, तसंच आपल्या भागिदारीची व्याप्ती वाढवण्यासाठी देशाची दृढ वचनबद्धताही अधोरेखित होईल असंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

'डीआरडीओ' अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांविरुद्ध बहु-स्तरीय संरक्षण आणि मध्यम पल्ल्यावरील जहाजांना लक्ष्य करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या तीन यशस्वी चाचण्या काल आणि परवा घेतल्या. त्या बद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओचं अभिनंदन केलं आहे. समाज माध्यमांवर सिंग यांनी म्हटलंय की, या चाचण्यांमुळे आक्रमक आणि प्रतिरोधक अशी क्षेपणास्त्र बाळगणाऱ्या निवडक देशांमधे आता भारताची गणना होते.  नौदलाच्या मध्यम पल्ल्याच्या जहाज-विरोधी क्षेपणास्त्रांनीही आपली क्षमता सिद्ध केली आहे, असंही त्यांनी सांगितलं. या चाचण्यांद्वारे लांब आणि मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्र हवेतच नष्ट करण्याची क्षमता सिद्ध झाली आहे.

<><><><><>

युद्धतंत्राच्या बदलत्या परिस्थितीत ड्रोन, उपग्रह आणि रोबोटिक्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याचं आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय हवाई दलात नव्याने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांना केलं. हैदराबादमधे डुंडीगल इथल्या हवाई

दल अकादमीमध्ये आयोजित २१७ व्या तुकडीच्या 'संयुक्त दीक्षांत संचलना'च्या प्रसंगी ते बोलत होते. आधुनिक काळात युद्धपद्धतीत मोठे बदल झाले आहेत आणि अधिकाऱ्यांनी नवीन युद्धप्रणाली आणि रणनीतींबाबत स्वतःला सतत अद्ययावत ठेवलं पाहिजे, असंही ते म्हणाले. यावेळी संरक्षण मंत्र्यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत प्रशिक्षण घेतलेल्या महिला कॅडेट्सच्या पहिल्या तुकडीलाही सेवेत समाविष्ट केलं. या महिला कॅडेट्स गेल्या वर्षी एनडीएमधून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर शाखा-विशिष्ट प्रशिक्षणासाठी हवाई दल अकादमीमध्ये दाखल झाल्या होत्या. यावेळी 'सु-३० एमकेआय' 'सारंग' हेलिकॉप्टर आणि 'सूर्यकिरण' एरोबॅटिक समूहाने त्यांची हवाई प्रात्यक्षिकही सादर केली. संरक्षण दलांच्या विविध शाखांमधील वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><>

भारतीय हवाई दलाच्या ए.एन. थर्टी टू  या विमानाला आज सकाळी आसाममधल्या हवाई दलाच्या जोरहाट तळावर अपघात झाला. यानंतर तातडीनं आग आटोक्यात आणण्याचं काम सुरु केल्याचं हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. या अपघाताच्या कारणाचा शोध घेण्यासाठी चौकशी समितीची स्थापना केली असल्याची माहितीही हवाई दलानं दिली आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज डेहराडून इथल्या इंडियन मिलिटरी अकादमीमध्ये दीक्षांत समारंभासाठी उपस्थित राहणार आहेत. या वर्षीच्या दीक्षांत संचलनामध्ये पहिल्यांदाच महिला कॅडेट्स सहभागी होणार आहेत. या भव्य सोहळ्यात ५०० हून अधिक कॅडेट्स अंतिम टप्पा पूर्ण करून भारतीय सैन्यात अधिकारी म्हणून नियुक्त होतील.

<><><><><>

इराणने अणुऊर्जेचा नागरी वापरासाठीचा कार्यक्रम राबवायला हरकत नसल्याचं ट्रंप प्रशासनानं म्हटलं आहे. इराणबरोबरच्या अणुकरारात तसं कलम समाविष्ट करायला हरकत नाही, मात्र त्यापूर्वी इराणला अण्वस्त्र तयार करता येणार नाही अशा रीतीने तिथल्या पायाभूत सुविधा नष्ट केल्या पाहिजेत अशी अट अमेरिकेने घातली आहे. दोन्ही देशांमधे शांतता कराराची बोलणी चालू असून त्यातला काही तपशील अमेरिकेच्या सूत्रांनी काल उघड केला. तहातल्या कलमांनुसार इराणला अण्वस्त्रनिर्मितीसाठी लागणारी सामुग्री नष्ट करावी लागेल, तसंच अणुप्रकल्पांची वेळोवेळी तपासणी करुन घ्यावी लागेल.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१३ जून २०२६ - शनिवार

<><><><>

भारताने रशियाकडून इंधनतेल खरेदी केल्याचं फिनलंडने समर्थन केलं आहे. तेलाच्या दरांबाबत युरोपात निश्चित केलेली मर्यादा पाळली असल्याचं फिनलंडच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री एलिना व्हाल्टोनेन यांनी सांगितलं. फिनलंडच्या दौऱ्यावर गेलेले परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस जयशंकर यांच्याशी त्या काल बोलत होत्या. अमेरिकेने जागतिक बाजारपेठेतला तोल सांभाळण्यासाठी भारताला रशियाकडून तेल खरेदीची मुभा दिली, आणि नंतर त्याबद्दल भारतीय मालावर दंडात्मक शुल्क लादलं, अशी टीका जयशंकर यांनी यावेळी केली.

<><><><>

काँगो मधल्या इटुरी प्रांतात इबोलाची लागण झालेल्या सतरा नवीन रुग्णांची नोंद झाली, तर आणखी पाच जणांचा मृत्यू झाला आहे. काँगोच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. यामुळे इबोलाची लागण झालेल्या रुग्णांची एकूण संख्या वाढून सहाशे एकोणनव्वदवर पोहोचली आहे, तर यापैकी एकशे एकोणचाळीस रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

इबोला विषाणूच्या बुंडिबुग्यो या नव्या प्रकारामुळे हा आजार उद्भवला आहे. या उद्रेकाचा सामना करत असताना वैद्यकीय साहित्याचा तुटवडा, मर्यादित उपचार क्षमता आणि निधीच्या कमतरतेची समस्या भेडसावत असल्याचंही या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

भारत आणि अफगाणिस्तान दरम्यान एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात होणार. मालिकेतला पहिला सामना हिमाचल प्रदेशात धरमशाला इथल्या मैदानावर होणार आहे, मात्र पावसामुळे नाणेफेकीला विलंब झाला आहे.

मालिकेतला दुसरा सामना येत्या १७ जूनला लखनऊ इथं, तर तिसरा आणि अखेरचा सामना २० जूनला चेन्नई इथं होणार आहे.

<><><><>

आयसीसी महिला टी -20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सलामीच्या सामन्यात यजमान इंग्लंडने श्रीलंकेचा ५७ धावांनी पराभव केला. इंग्लंडच्या संघाने २० षटकांत एक बाद २१९धावा केल्या तर श्रीलंकेचा डाव १३२ धावांत आटोपला. भारताचा पहिला सामना पाकिस्तानविरूद्ध उद्या होणार आहे.

<><><><>

सिडनी इथं सुरू असलेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताची दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी व्ही सिंधू हिचं आव्हान उपांत्य फेरीत संपुष्टात आलं आहे. आज झालेल्या महिला एकेरीच्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात जपानच्या आकाने यामागुचीने सिंधूचा सरळ गेममध्ये पराभव केला.

**<><><><><>**

भारत आणि जर्मनी यांच्यातली विकास भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी आज नवी दिल्लीत नीती आयोग आणि जर्मनीच्या शिष्टमंडळाची बैठक झाली. जर्मनीचं तांत्रिक कौशल्य आणि आर्थिक क्षमता, तर भारताची धोरणात्मक महत्त्वाकांक्षा आणि संस्थात्मक ताकद या एकमेकांना पूरक असल्याचं मत या बैठकीत व्यक्त करण्यात आलं. सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून शाश्वत पायाभूत सुविधा उभारणं, शेती क्षेत्रात आधुनिक बदल घडवणं आणि जलसंपत्तीचं योग्य व्यवस्थापन करणं, यावर दोन्ही देशांनी या बैठकीत सविस्तर चर्चा केली, अशी माहिती नीती आयोगानं दिली. हरित अर्थव्यवस्थेमध्ये लघु आणि मध्यम उद्योगांचा सहभाग कसा वाढवता येईल आणि शाश्वत विकासाच्या उद्दिष्टानुसार आर्थिक व्यवहारांची सांगड कशी घालता येईल, या मुद्द्यावरही या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगड राज्यांमध्ये पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे. आसाम आणि मेघालयमध्ये आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज आहे. पुढील दोन दिवसांत देशाच्या काही भागांत मुसळधार पावसाची तर महाराष्ट्रात उद्यापर्यंत मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भात आज उष्णतेच्या लाटेची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**